# महावितरण महावितरण विद्युत वार्ता

■ वर्ष : १८ ■ अंक : २७-२८ ■ सप्टेंबर-ऑक्टोबर २०२५ ■ पाने : १६

# महावितरणसाठी अभिमानास्पद क्षण

महावितरणसाठी सप्टेंबर महिना अभिमानास्पद क्षण घेऊन आला. मा. पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी यांच्या हस्ते राज्यातील शेतकऱ्यांसाठीच्या २,४५८ मेगावॅट क्षमतेच्या ४५४ सौर ऊर्जा निर्मिती प्रकल्पांचे २५ सप्टेंबर रोजी ऑनलाईन लोकार्पण झाले. मा. मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत झालेला हा कार्यक्रम म्हणजे महावितरणच्या इतिहासातील एक अभिमानास्पद क्षण आहे. याच महिन्यात केंद्र सरकारच्या ऊर्जा मंत्रालयाने केलेल्या मूल्यांकनात १०० पैकी ९३ गुण मिळवून महावितरण पहिल्या क्रमांकाची कंपनी ठरली. तसेच इकॉनॉमिक टाइम्स या प्रतिष्ठित आर्थिक दैनिकातर्फे आयोजित ईटी एनर्जी लीडरशिप ॲवॉर्ड्स २०२५ या नवी दिल्ली येथील सोहळ्यात महावितरणला मोठ्या कंपन्यांच्या गटात प्रतिष्ठेचा एनर्जी कंपनी ॲवॉर्ड मिळाला तर राज्याच्या अपर मुख्य सचिव (ऊर्जा) आभा शुक्ला यांना वूमेन इन एनर्जी ॲवॉर्डने सन्मानित करण्यात आले.

सौर प्रकल्पांच्या लोकार्पण कार्यक्रमाच्या निमित्ताने मा. पंतप्रधानांनी महाराष्ट्रातील सौर ऊर्जा प्रकल्पांच्या लाभार्थी शेतकऱ्यांशी बातचित केली. पीएम कुसुम-सी अर्थात मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० आणि पीएम कुसुम-बी अर्थात मागेल त्याला सौर कृषी पंप या योजनांच्या लाभार्थी शेतकऱ्यांनी या योजनांमुळे त्यांना कसा लाभ झाला हे आनंदाने मा. पंतप्रधानांना सांगितले, ही समाधानाची बाब झाली.

मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना-२.० ही राज्यातील शेतकऱ्यांची अनेक दशकांची कृषी पंपांसाठी दिवसा वीज पुरवठ्याची मागणी पूर्ण करणारी गेम चेंजर योजना आहे. या योजनेत राज्यात एकूण १६,००० मेगावॅट क्षमतेचे सौर ऊर्जा निर्मिती प्रकल्प उभारण्यात येत असून त्याच्या आधारे कृषी पंपांसाठी शंभर टक्के सौर ऊर्जेचा पुरवठा करण्याचे ध्येय आहे. ही जगातील सर्वात मोठी विकेंद्रित सौर ऊर्जा निर्मिती योजना आहे. यामुळे राज्यातील सर्व ४५ लाख कृषी पंपांना दिवसा वीज पुरवठा होईल. या योजनेत सरासरी ३ रुपये प्रती युनिट इतक्या कमी दराने वीज उपलब्ध होत असल्याने महावितरणचे आगामी पाच वर्षात वीज खरेदीचे दहा हजार कोटी रुपये वाचणार आहेत. महावितरणने राज्यात प्रथमच वीजदरात कपात करण्याची ऐतिहासिक कामगिरी केली असून त्यामध्ये मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजनेचा सिंहाचा वाटा आहे. शेतकऱ्यांचा प्रश्न सोडवितानाच संपूर्ण राज्याच्या आर्थिक विकासाला चालना देणारी ही

## हितगुज



लोकेश चंद्र
अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक

योजना आहे. मा. पंतप्रधानांनी लोकार्पण केलेल्या ४५४ सौर ऊर्जा निर्मिती प्रकल्पांमुळे सहा लाख शेतकऱ्यांना दिवसा वीज पुरवठा होत असून ३२ लाख एकर जमिनीवर सिंचनाला मदत होत आहे.

पीएम कुसुम-बी अर्थात महाराष्ट्रातील मागेल त्याला सौर कृषी पंप ही योजना यशस्वी ठरली आहे. देशात पीएम कुसुम बी योजनेत एकूण ८,६२,७४८ पंप बसविण्यात आले असून त्यापैकी महाराष्ट्र राज्यातील ४,४१,३५१ पंप आहेत. अन्य राज्यांनी बसविलेल्या एकूण पंपांपेक्षा महाराष्ट्राची संख्या जास्त आहे. या योजनेत केंद्र व राज्य सरकारकडून ९० ते ९५ टक्के अनुदान मिळते. त्यामुळे शेतकऱ्यांना केवळ पाच ते दहा टक्के रक्कम भरून सोलर पॅनेल्स व पंप असा पूर्ण संच मिळतो. शेतकऱ्यांना सिंचनाच्या बाबतीत पूर्ण स्वतंत्र करणारी ही योजना आहे. एकदा सोलर पॅनेल्स बसविले की त्यातून पंचवीस वर्षे वीजनिर्मिती होत राहते व त्याच्या आधारावर दिवसभरात हवे तेव्हा सिंचनाची सुविधा शेतकऱ्याला उपलब्ध होते. तसेच वीजबिलाचीही चिंता उरत नाही.

**ऊर्जा मंत्रालयाच्या मानांकनात प्रथम क्रमांक**

केंद्र सरकारच्या ऊर्जा मंत्रालयाने निश्चित केलेल्या मानांकनामध्ये १०० पैकी ९३ गुण मिळवून महावितरणने प्रथम क्रमांक मिळविला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात गेली तीन वर्षे राज्याच्या ऊर्जा क्षेत्रात परिवर्तन चालू आहे. काळाची पावले ओळखून आणि आगामी काळातील ऊर्जा क्षेत्रातील गरजा ध्यानात घेऊन मा. मुख्यमंत्र्यांनी अनेक क्रांतिकारी उपक्रम सुरू केले. त्यामुळेच महावितरणची कामगिरी उंचावली आहे. महावितरण प्रथम क्रमांकाची कंपनी ठरली याचे संपूर्ण श्रेय मा. मुख्यमंत्र्यांच्या नेतृत्वाला आहे.

ऊर्जा मंत्रालयाच्या वतीने आरईसी व पॉवर फाऊंडेशन ऑफ इंडिया यांनी वीज कंपन्यांचे मानांकन निश्चित केले. त्यांनी 'रेटिंग रेग्युलेटरी परफॉर्मन्स ऑफ स्टेट्स अँड युनियन टेरिटरीज' असा मानांकनाचा अहवाल तयार केला आहे. त्यामध्ये महावितरणला ९३ गुण मिळाले असून ए मानांकन मिळाले आहे. मानांकन निश्चित करण्यासाठी पाच निकष ठरविण्यात आले होते. त्यापैकी संसाधन पर्याप्तता (३२ पैकी ३२ गुण), ऊर्जा परिवर्तन (१५ पैकी १५ गुण) व नियामकाच्या अनुषंगाने प्रशासन (५ पैकी ५) या तीन घटकात महावितरणला पैकीच्या पैकी गुण मिळाले. वीज कंपनीचे आर्थिक स्थैर्य या घटकात २५ पैकी २४ गुण मिळाले. जीवन सुलभता व व्यवसाय सुलभता या निकषात महावितरणला २३ पैकी १७ गुण मिळाले. वीज नियामक आयोगाने सार्वजनिक स्वरुपात प्रसिद्ध केलेल्या आकडेवारी व माहितीच्या आधारे आरईसी व पॉवर फाऊंडेशन ऑफ इंडिया यांनी मानांकन ठरविले आहे. तसा स्पष्ट उल्लेख त्यांनी त्याविषयीच्या अहवालात केला आहे.

**उंचावलेल्या अपेक्षा पूर्ण करू या**

मा. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सुरू केलेल्या मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० च्या अंमलबजावणीत महावितरणचा पुढाकार आहे. या योजनेतील सौर प्रकल्पांचे मा. पंतप्रधानांच्या हस्ते लोकार्पण झाल्यामुळे महावितरणच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांचा उत्साह वाढला आहे. सौर ऊर्जा योजनांमुळे शेतकऱ्यांच्या आयुष्यात किती सकारात्मक बदल झाला हे त्यांनी मा. पंतप्रधानांशी केलेल्या संवादात स्पष्ट झाले. महावितरणच्या कामामुळे शेतकऱ्यांना थेट लाभ होत आहे, ही बाब उत्साह वाढविणारी आहे. त्याचबरोबर महावितरणला केंद्रीय ऊर्जा मंत्रालयाच्या मानांकनामध्ये १०० पैकी ९३ गुण मिळून प्रथम क्रमांक मिळाला ही विशेष आनंदाची बाब आहे. इकॉनॉमिक टाइम्सने महावितरणला प्रतिष्ठेचा पुरस्कार देऊन गौरव केल्यामुळे कंपनीला प्रोत्साहन मिळाले आहे.


महावितरण वीज ग्राहकांना उत्तम सेवा देण्यास वचनबद्ध आहे. ग्राहकांना सेवा देण्यासोबतच रास्त दरात दर्जेदार वीज पुरवठा करून आपण राज्याच्या आर्थिक विकासाला मदत करत असतो. असंख्य आव्हानांवर मात करत महावितरणने यश मिळविले आहे. याच उत्साहाने आणि उमेदीने आपल्याकडून उंचावलेल्या अपेक्षा पूर्ण करण्याचा निर्धार करू या. सर्वांचे अभिनंदन.

# सुलभ सेवा व वीजबिल वसुलीवर भर द्या

## संचालक (संचालन) सचिन तालेवार यांचे निर्देश

**महावितरणचे** काम अधिक पारदर्शक आणि कार्यक्षम बनवण्यासाठी संचालक (संचलन व प्रकल्प) सचिन तालेवार यांनी नागपूर परिमंडलातील अधिकाऱ्यांना महत्त्वाचे निर्देश दिले. त्यांनी वीजबिल वसुलीवर भर, ग्राहकांना सहज आणि सोप्या पद्धतीने नवीन वीज जोडणी तसेच सर्व शासकीय कार्यालयांमध्ये टीओडी मीटर लवकरात लवकर बसवण्याचे निर्देश दिले.

नागपूर परिमंडलातील तांत्रिक, लेखा आणि मानव संसाधन विभागाच्या आढावा बैठकीत त्यांनी या सूचना दिल्या. मुख्य अभियंता दिलीप दोडके, अधीक्षक अभियंते अमित परांजपे, संजय वाकडे, मंगेश वैद्य, महाव्यवस्थापक (वित्त व लेखा) अतुल राऊत, सहायक महाव्यवस्थापक (मानव संसाधन) महेश जाधव, यांच्यासह परिमंडलातील सर्व कार्यकारी अभियंते यावेळी उपस्थित होते. संचालक (संचलन व प्रकल्प) सचिन तालेवार म्हणाले, वीजबिल नियमितपणे भरणाऱ्या ग्राहकांची संख्या वाढवण्यावर भर द्या, वीजबिल थकबाकीचे विश्लेषण करुन ती प्राधान्याने कमी करण्याच्या सूचना त्यांनी दिल्या.



नागपूर परिमंडलाच्या आढावा बैठकीत मार्गदर्शन करताना संचालक (संचलन व प्रकल्प) सचिन तालेवार. समवेत मुख्य अभियंता दिलीप दोडके.

अपघात आणि नुकसान भरपाईच्या प्रकरणांचा त्वरित निपटारा, तक्रारींचा नियमांनुसार त्वरित निपटारा, विकास आराखडा तयार करताना केवळ आवश्यक कामांना प्राधान्य, रोहित्र आणि रोहित्रातील ऑइल चोरीच्या प्रकरणांमध्ये तत्काळ गुन्हे दाखल करणे, नवीन वीजजोडणी तातडीने देण्याचे निर्देश संचालक सचिन तालेवार यांनी या बैठकीत दिले.

# अखंडित वीज सेवेसाठी उपकेंद्राची गुणवत्ता महत्वाची

## संचालक (मानव संसाधन) श्री. राजेंद्र पवार

**'इज ऑफ लिव्हिंग'** अर्थात ग्राहकांचे जीवनमान उंचावण्यासाठी वीज हा अत्यंत महत्त्वाचा घटक आहे. त्यामुळे ग्राहकांना दर्जेदार वीजपुरवठा करणे ही आपली जबाबदारी आहे. प्रत्येक उपविभागात किमान एका उपकेंद्राचे सक्षमीकरण आणि नुतणीकरण आयएसओ मानकानुसार करावे. सर्वांच्या सांघिक कामगिरीमुळे महावितरणला प्रथम क्रमांक मिळाला असुन त्यामुळे जबाबदारी अधिक वाढली आहे. मनुष्यबळ पुनर्रचनेमुळे ग्राहकांना दर्जेदार वीजसेवा मिळणार असल्याची माहिती संचालक (मानव संसाधन) राजेंद्र पवार यांनी दिली.

अमरावती आणि कोल्हापूर येथे स्वतंत्रपणे आयोजित करण्यात आलेल्या आढावा बैठकांमध्ये ते बोलत होते. अमरावती येथील बैठकीला मुख्य अभियंता अशोक साळुंके, अधीक्षक अभियंता प्रविण दरोली तर कोल्हापूर येथील बैठकीला अधिक्षक अभियंते गणपत लटपटे व पूनम रोकडे उपस्थित होते.

**मनुष्यबळ पुनर्रचनेमुळे वीजग्राहकांना दर्जेदार सेवा** – वीज ग्राहकांना अधिक चांगली सेवा देण्यासाठी आणि कर्मचाऱ्यांवरील कामाचा ताण कमी करण्यासाठी मनुष्यबळ पुनर्रचना करण्यात येत आहे. यात कोणत्याही कर्मचाऱ्याला कमी केले जाणार नाही, अशी माहिती संचालक राजेंद्र पवार यांनी दिली. केंद्र शासनाच्या ऊर्जा मंत्रालयाने निश्चित केलेल्या मानांकनामध्ये शंभरपैकी ९३ गुण मिळवून महावितरणने प्रथम क्रमांक मिळविला आहे. सर्व अभियंते, अधिकारी व कर्मचाऱ्यांनी सांघिकपणे विविध आघाड्यांवर रिजल्ट ओरिएंटेड पद्धतीने काम केले आहे. त्याचे यश म्हणून मानांकनात प्रथम क्रमांक मिळाला आहे. आता जबाबदारी वाढली असून आणखी दर्जेदार ग्राहक सेवा देण्यासाठी सज्ञ राहावे, असे निर्देश त्यांनी दिले.

**महिला कर्मचाऱ्यांशी साधला विशेष संवाद** – विजेसारख्या तांत्रिक क्षेत्रात आज महिला मोठ्या संख्येने कार्यरत आहेत. निसर्गाने दिलेल्या संवेदनशीलता व कल्पकता या गुणांचा वापर महावितरणच्या महिला अधिकारी–कर्मचारी प्रशासनात व ग्राहक सेवेत प्रभावीपणे करतात. त्यामुळेच महावितरणमध्ये महिला अधिकारी व कर्मचारी यांचे योगदान महत्वपूर्ण आहे, असे गौरवोद्गार काढत संचालक राजेंद्र पवार यांनी कोल्हापूर आणि यवतमाळ येथे महिला अधिकारी व कर्मचारी यांच्याशी विशेष संवाद साधत त्यांचा सन्मान केला.

**यवतमाळमधील २ उपकेंद्रांना आयएसओ मानांकन** : यवतमाळ जिल्ह्यातील ३३/११ केव्ही करणवाडी (खापरी) आणि ३३/११ केव्ही माथार्जून या दोन्ही विद्युत उपकेंद्रांना आयएसओ:९००१:२०१५ मानांकन मिळाले आहे. या दोन्ही उपकेंद्राला मिळालेल्या आयएसओ मानांकनाचे प्रमाणपत्र संचालक राजेंद्र पवार यांच्या हस्ते प्रदान करण्यात आले. यावेळी कार्यकारी अभियंता नरेंद्र कटारे, संजय खंगार, शशांक पोंक्षे उपस्थित होते.



यवतमाळ जिल्ह्यातील आयएसओ मानांकन प्राप्त ३३/११ केव्ही करणवाडी (खापरी) उपकेंद्राची पाहणी करताना संचालक (मानव संसाधन) राजेंद्र पवार. समवेत मुख्य अभियंता अशोक साळुंके व इतर अधिकारी.

# वीज क्षेत्रातील कामगिरीत महावितरणचा प्रथम क्रमांक

## केंद्र सरकारच्या मानांकनात यश, १०० पैकी ९३ गुण

**केंद्र** सरकारच्या ऊर्जा मंत्रालयाने निश्चित केलेल्या मानांकनामध्ये शंभरपैकी ९३ गुण मिळवून महावितरणने प्रथम क्रमांक मिळविला आहे. मा. मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात महावितरणने केलेल्या कामगिरीमुळे कंपनीला यश मिळाले आहे. या यशाबद्दल आपण मा. मुख्यमंत्र्याचे आभार मानतो तसेच महावितरणचे अधिकारी व कर्मचाऱ्यांचे अभिनंदन करतो, असे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांनी सांगितले.

महावितरणच्या कामगिरीत मा. ऊर्जा राज्यमंत्री श्रीमती मेघना साकोरे बोर्डीकर व अपर मुख्य सचिव (ऊर्जा) आभा शुक्ला यांचे मार्गदर्शन महत्त्वाचे ठरले, असे ते म्हणाले.

ऊर्जा मंत्रालयाच्या वतीने आरईसी व पॉवर फाऊंडेशन ऑफ इंडिया यांनी वीज कंपन्यांचे मानांकन निश्चित केले. पश्चिम भारतातील राज्ये व केंद्रशासित प्रदेशांमध्ये एकूण १०० पैकी ९३ गुणांसह महाराष्ट्र प्रथम क्रमांकावर आहे व राज्याला ए मानांकन मिळाले आहे. महाराष्ट्राच्या पाठोपाठ मध्य प्रदेश (८४.५ गुण), गोवा (७४ गुण), दादरा, नगर हवेली आणि दीव दमण (७४ गुण), गुजरात (६७ गुण) व छत्तीसगड (५२ गुण) यांचा क्रमांक लागतो.

मानांकन निश्चित करण्यासाठी पाच निकष ठरविण्यात आले होते. त्यापैकी संसाधन पर्याप्तता (३२ पैकी ३२ गुण), ऊर्जा परिवर्तन (१५ पैकी १५ गुण) व नियामकाच्या अनुषंगाने प्रशासन (५ पैकी ५) या तीन घटकात महावितरणला पैकीच्या पैकी गुण मिळाले. वीज कंपनीचे आर्थिक स्थैर्य या घटकात २५ पैकी २४ गुण मिळाले. जीवन सुलभता व व्यवसाय सुलभता या निकषात महावितरणला २३ पैकी १७ गुण मिळाले. या निकषात गुजरातला १४ तर मध्य प्रदेशला १६ गुण मिळाले.

वीज क्षेत्रातील कामगिरीबद्दल गुणांकनाची प्रक्रिया ३ मार्च रोजी सुरू झाली होती. देशातील मानांकनामध्ये ८५ पेक्षा अधिक गुण मिळविणाऱ्या राज्यांचा ए गटात समावेश केला असून त्यामध्ये महाराष्ट्रासह एकूण ८ राज्ये आहेत.

**यशाची कारणे :**

महावितरणने गेल्या तीन वर्षात ग्राहकांना अधिक चांगली सेवा देण्यासाठी तसेच भविष्यकाळाचा वेध घेऊन वीज पुरवठ्याचे नियोजन करण्यासाठी महत्त्वाची पावले उचलली. त्यामुळे मानांकन उंचावले आहे.

आगामी काळात राज्याची विजेची मागणी किती असेल याचा अभ्यास करून महावितरणने ऊर्जा विभागाच्या मदतीने आराखडा तयार केला. अशा प्रकारे ऊर्जा परिवर्तन आराखडा तयार करणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य आहे.

ऊर्जा परिवर्तन आराखड्यानुसार महावितरणने गेल्या अडीच वर्षात ४५,००० मेगावॅट वीज खरेदीसाठीचे करार केले व आगामी पाच वर्षांची तरतूद केली. या वीज खरेदी करारांमध्ये नवीकरणीय ऊर्जेवर भर दिल्यामुळे आगामी पाच वर्षात वीज खरेदीचे ६६ हजार कोटी रुपये वाचणार असून त्याच्या आधारे महावितरणच्या वीजदरात पाच वर्षांसाठी सर्वच ग्राहकांच्या वीजदरात कपात करण्यात आली आहे.

शेतकऱ्यांना दिवसा वीज पुरवठा करण्यासाठीचा मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० हा १६ हजार मेगावॅट क्षमतेचा सौर ऊर्जा प्रकल्प महावितरणच्या पुढाकाराने राबविण्यात येत आहे. शेतांमध्ये सौर पंप बसविण्याच्या बाबतीत महाराष्ट्राने देशात प्रथम क्रमांक मिळविला आहे. वीज पुरवठ्याचे जाळे अधिक मजबूत करण्यासाठी महावितरणतर्फे आरडीएसएस योजनेच्या अंतर्गत पायाभूत सुविधांचे काम प्रभावीपणे चालू आहे. या सर्वांचा विशेषतः वीजदर कपातीत मिळालेल्या यशाचा परिणाम म्हणून महावितरणला १०० पैकी ९३ गुण मिळाले.

# गुत्ती येथील ५ मेगावॅट सौरऊर्जा प्रकल्प

## मा. मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते लोकार्पण



गुत्ती येथील पाच मेगावॅट क्षमतेच्या सौरऊर्जा प्रकल्पाचे लोकार्पण करताना मा. मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस. समवेत मा. सार्वजनिक बांधकाम मंत्री श्री. शिवेंद्रसिंहराजे भोसले, मा. पर्यावरण व वातावरणीय बदल आणि पशुसंवर्धन मंत्री श्रीमती पंकजा मुंडे, मा. ग्रामविकास व पंचायत राज मंत्री श्री. जयकुमार गोरे.

**मुख्यमंत्री** सौर कृषि वाहिनी योजना २.० अंतर्गत लातूर जिल्हयाच्या जळकोट तालुक्यातील गुत्ती येथे उभारण्यात आलेल्या पाच मेगावॅट क्षमतेच्या सौरऊर्जा प्रकल्पाचे लोकार्पण मा. मुख्यमंत्री व ऊर्जामंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते दूरदृश्य प्रणालीद्वारे करण्यात आले. या प्रकल्पामुळे गुत्ती व परिसरातील ७७२ कृषीपंपांना दिवसा वीज मिळणार आहे.

दयानंद महाविद्यालयाच्या प्रांगणात पार पडलेल्या लोकनेते स्व. गोपीनाथराव मुंडे यांच्या पूर्णाकृती पुतळ्याच्या अनावरण सोहळ्याच्या कार्यक्रमात गुत्ती येथील सौरऊर्जा प्रकल्पाच्या लोकार्पण प्रसंगी राज्याचे मा. सार्वजनिक बांधकाम मंत्री तथा लातूर जिल्ह्याचे पालकमंत्री श्री. शिवेंद्रसिंहराजे भोसले, मा. पर्यावरण व वातावरणीय बदल आणि पशुसंवर्धन मंत्री श्रीमती पंकजा मुंडे, मा. ग्रामविकास व पंचायत राज मंत्री श्री. जयकुमार गोरे, राज्य कृषिमूल्य आयोगाचे अध्यक्ष पाशा पटेल, आमदार विक्रम काळे, आमदार संभाजी पाटील निलंगेकर, आमदार धनंजय मुंडे, आमदार संजय बनसोडे, आमदार अभिमन्यू पवार, आमदार रमेश कराड, आमदार संजय केणेकर, जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांची प्रामुख्याने उपस्थिती होती.

लातूर परिमंडलात ७३ सौरऊर्जा प्रकल्प कार्यान्वीत झाले असून ३१९ मेगावॅट वीज निर्मिती होत आहे. सौरऊर्जा प्रकल्पांची उभारणी गतीने करण्यावर भर असून लातूर परिमंडलात वेगाने सौरऊर्जा निर्मिती प्रकल्प उभारले जात असल्याबद्दल मा. मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांनी समाधान व्यक्त केले.

# अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांना ‘एनर्जी लीडरशिप अवॉर्ड’

**अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक** लोकेश चंद्र यांना इंग्लंडच्या ‘वर्ल्ड रेकॉर्ड ऑफ एक्सलन्स’तर्फे ऊर्जा क्षेत्रातील भरीव कामगिरीबद्दल ‘एनर्जी लीडरशिप अवॉर्ड २०२५’ प्रदान करण्यात आला.

मा. मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात राज्याच्या ऊर्जा क्षेत्रात परिवर्तन चालू असून त्यांच्या नेतृत्वाखाली केलेल्या कामामुळे हा सन्मान झाला आहे. महावितरणच्या कामगिरीत राज्याच्या मा. ऊर्जा राज्यमंत्री श्रीमती मेघना साकोरे बोर्डीकर व अपर मुख्य सचिव (ऊर्जा) आभा शुक्ला यांचे मार्गदर्शन महत्त्वाचे ठरले. या पुरस्काराचे श्रेय महावितरणच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांना आहे, असे लोकेश चंद्र यांनी सांगितले.

वर्ल्ड रेकॉर्ड ऑफ एक्सलन्सचे प्रमुख पाब्लो स्टॅन्ले व अध्यक्ष हेन्री आर. यांच्या स्वाक्षरीने लोकेश चंद्र यांना पुरस्कारस्वरूप प्रशस्तीपत्र प्रदान करण्यात आले. ‘वर्ल्ड रेकॉर्ड ऑफ एक्सलन्स’ ही इंग्लंडमधील जागतिक स्तरावर मान्यताप्राप्त संस्था आहे.

प्रशस्तीपत्रात म्हटले आहे की, ऊर्जा क्षेत्रातील असामान्य नेतृत्व, प्रशासनातील दूरदृष्टी आणि महाराष्ट्राच्या वीज वितरण क्षेत्रातील असामान्य योगदानाबद्दल लोकेश चंद्र यांना एनर्जी लीडरशीप अवॉर्ड २०२५ प्रदान करण्यात येत आहे. कार्यक्षमता, कल्पकता आणि सेवेबद्दलच्या समर्पित वृत्तीमुळे लोकेश चंद्र यांनी अक्षय्य ऊर्जेच्या वापराला चालना देण्यासोबतच लाखो नागरिकांना भरवशाचा वीज पुरवठा करण्यात प्रमुख भूमिका बजावली आहे.

अक्षय ऊर्जेचा वापर करून वीजखरेदी खर्चात मोठी बचत करून वीजदरात कपात करण्याची ऐतिहासिक कामगिरी महावितरणने केली आहे. अशा प्रकारे वीजदरात कपात करणारी महावितरण ही देशातील पहिलीच सार्वजनिक वीज वितरण कंपनी आहे. पुढील पाच वर्षात वीज खरेदीमध्ये अक्षय्य ऊर्जेवर भर दिल्यामुळे महावितरणची सुमारे ६६ हजार कोटी रुपयांची बचत होणार असल्याने पाच वर्षे वीजदरात कपात शक्य झाली आहे.

मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० या शेतकऱ्यांना दिवसा वीज पुरवठा करण्यासाठीच्या जगातील सर्वात मोठ्या विकेंद्रित सौर ऊर्जा निर्मिती प्रकल्पाच्या अंमलबजावणीत लोकेश चंद्र यांच्या नेतृत्वात महावितरणने महत्त्वाची कामगिरी बजावली आहे. राज्यात ठिकठिकाणी सौर ऊर्जा निर्मिती प्रकल्प उभारून त्यावर ४५ लाख कृषी पंप चालविण्याची ही १६,००० मेगावॅट क्षमतेची गेम चेंजर योजना आहे.

प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजना या घरगुती ग्राहकांना मोफत वीज मिळवून देणाऱ्या छतावरील सौर ऊर्जा निर्मिती योजनेमध्ये राज्यातील ग्राहकांनी नुकताच एक हजार मेगावॅटचा टप्पा ओलांडला. महाराष्ट्रात या योजनेची अंमलबजावणी महावितरण करत आहे.



अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र.

शेतकऱ्यांना हक्काची सिंचन व्यवस्था मिळण्यासाठी शेतात सौर कृषी पंप बसविण्यामध्ये महाराष्ट्राने देशात प्रथम क्रमांक मिळविला आहे. मागेल त्याला सौर कृषी पंप योजनेच्या अंमलबजावणीत महावितरणने देशात सर्वाधिक पंप बसविले आहेत.

# राज्यातील सौर ऊर्जेच्या विविध योजनांची अंमलबजावणी व यश इतरांसाठी आदर्श

## केरळचे अपर मुख्य सचिव पुनीत कुमार यांचे गौरवोद्‌गार




सौर ऊर्जेच्या विविध योजनांच्या अंमलबजावणीची माहिती घेताना केरळचे अपर मुख्य सचिव (ऊर्जा) पुनीत कुमार. यावेळी उपस्थित अपर मुख्य सचिव (ऊर्जा) आभा शुक्ला, अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र.

**गेल्या अडीच** वर्षांमध्ये महाराष्ट्रात महावितरणने सौर ऊर्जेच्या विविध योजनांची प्रभावी अंमलबजावणी केली आहे. त्यामुळे वीजदर कपातीसह शेतकऱ्यांना दिवसा वीजपुरवठा, घरगुती ग्राहकांना सौर दिवसा वीज दरात सवलत तसेच क्रॉस सबसिडीचा बोजा कमी होऊन औद्योगिक व व्यावसायिक वीज दरात घट होण्यास सुरवात झाली आहे. सौर योजनांची ही अंमलबजावणी व फलनिष्पत्ती इतर राज्यांसाठी आदर्श आहे, असे गौरवोद्‌गार केरळ राज्याचे अपर मुख्य सचिव (ऊर्जा) पुनीत कुमार यांनी काढले.

महाराष्ट्रातील विविध सौर ऊर्जा योजनांची अंमलबजावणी संदर्भात माहिती घेण्यासाठी पुनीत कुमार यांनी ‘प्रकाशगड’ला भेट दिली. यावेळी आयोजित बैठकीत अपर मुख्य सचिव (ऊर्जा) आभा शुक्ला व अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांनी विविध सौर योजनांमुळे सन २०३० पर्यंत राज्याच्या वीजक्षेत्रात होणारे आमुलाग्र बदल, ग्राहकाभिमुख फायदे, वीज दर कपात, आर्थिक गुंतवणूक व रोजगार संधी आदींची माहिती दिली. यावेळी संचालक सचिन तालेवार (संचालन/प्रकल्प), योगेश गडकरी (वाणिज्य), राजेंद्र पवार (मानव संसाधन) उपस्थित होते.

अपर मुख्य सचिव पुनीत कुमार यांनी सौर योजनांच्या विविध मुद्दयांवर चर्चा केली. महाराष्ट्राने सौर ऊर्जेत कमी कालावधीमध्ये केलेली मोठी प्रगती व त्यास मिळालेले यश अनुकरणीय आहे असे पुनीत कुमार यांनी सांगितले. यावेळी कार्यकारी संचालक प्रसाद रेशमे, परेश भागवत, धनंजय औंढेकर, स्वाती व्यवहारे, दत्तात्रेय पडळकर, दिनेश अग्रवाल, प्रादेशिक संचालक भुजंग खंदारे, विशेष कार्य अधिकारी मंगेश कोहाट व संतोष सांगळे यांची उपस्थिती होती.

# अपर मुख्य सचिव आभा शुक्ला यांच्यासह महावितरणला 'एनर्जी लिडरशिप अवॉर्ड'

## नवी दिल्लीमध्ये राष्ट्रीय शिखर परिषदेत सन्मान

**सामाजिक** व आर्थिक प्रगतीसाठी महत्त्वाच्या विद्युत क्षेत्रामध्ये विविध योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी राज्याच्या अपर मुख्य सचिव (ऊर्जा) आभा शुक्ला यांना वैयक्तिक गटात वर्ष २०२५ साठी 'वूमेन इन एनर्जी अवॉर्ड'ने तर कंपनी गटात महावितरणला 'एनर्जी कंपनी (पॉवर) अवॉर्ड'ने नवी दिल्ली येथील राष्ट्रीय एनर्जी लिडरशिप शिखर परिषदेत गौरविण्यात आले.

मा. मुख्यमंत्री व ऊर्जामंत्री श्री. देवेंद्र फडणवीस आणि मा. ऊर्जा राज्यमंत्री श्रीमती मेघना साकोरे–बोर्डीकर यांनी या सन्मानाबद्दल अपर मुख्य सचिव आभा शुक्ला यांचे तसेच महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र आणि सर्व अभियंता, अधिकारी व कर्मचाऱ्यांचे अभिनंदन केले आहे.

मा. केंद्रीय नवीन व नवीकरणीय राज्यमंत्री श्री. श्रीपाद नाईक आणि सेवानिवृत्त केंद्रीय ऊर्जा सचिव अनिल राजदान यांच्या हस्ते अपर मुख्य सचिव आभा शुक्ला यांना हे पुरस्कार प्रदान करण्यात आले. इकॉनॉमिक टाइम्सच्या वतीने आयोजित दोन दिवसीय वार्षिक शिखर परिषद २०२५ मध्ये ऊर्जा, पेट्रोलियम व नैसर्गिक वायू, अक्षय ऊर्जा, खाण, पर्यावरण, वन आणि हवामान बदल आदी क्षेत्रातील सुमारे ५०० राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय प्रतिनिधींची उपस्थिती होती. या परिषदेत अपर मुख्य सचिव आभा शुक्ला यांचे महाराष्ट्रातील वीजक्षेत्राच्या सादरीकरणासह विशेष व्याख्यान झाले.

मा. मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांनी राज्यात ऊर्जा परिवर्तनातून सर्व वीज ग्राहकांसाठी फायदेशीर आमुलाग्र सुधारणांना वेग दिला आहे. त्यामुळे वीज दरात प्रथमच घट झाली असून येत्या पाच वर्षांत ते आणखी कमी होत जाणार आहे. जगातील सर्वात मोठ्या १६ हजार मेगावॅट विकेंद्रीत सौर ऊर्जा प्रकल्पांच्या मुख्यमंत्री सौर कृषिवाहिनी योजना २.० द्वारे ६५ हजार कोटी रुपयांच्या गुंतवणुकीसह ७० हजारांवर ग्रामीण रोजगार निर्मिती सुरू आहे. या योजनेमुळे महावितरणच्या वीज खरेदीमध्ये १० हजार कोटींच्या वार्षिक बचतीसोबतच क्रॉस सबसिडीमध्ये १३ हजार ५०० कोटींनी वार्षिक बोजा कमी होणार आहे. त्यामुळे प्रामुख्याने औद्योगिक व व्यावसायिक विजेचे दर स्वस्त होत जाणार आहेत. या योजनेत आतापर्यंत २४५८ मेगावॅट क्षमतेचे ४५४ प्रकल्प पूर्ण झाले असून ६ लाखांवरील शेतकऱ्यांना दिवसा वीज उपलब्ध झाली आहे तर ३२ लाख एकर शेतजमीनीचे सौर ऊर्जेद्वारे सिंचन होत आहे.

यासोबतच सौर कृषिपंपाच्या विविध योजनेमधून राज्यात ६ लाख ४७ हजार सौर कृषिपंप कार्यान्वित करण्यात आले असून त्याद्वारे २१ लाख एकर जमीन ओलिताखाली आली आहे. सौर कृषिपंप बसविण्यामध्ये महाराष्ट्र देशात प्रथम क्रमांकावर आहे.




▸▸ राज्याच्या अपर मुख्य सचिव (ऊर्जा) आभा शुक्ला यांना नवी दिल्ली येथे केंद्रीय नवीन व नवीकरणीय राज्यमंत्री ना. श्रीपाद नाईक, सेवानिवृत्त केंद्रीय ऊर्जा सचिव श्री. अनिल राजदान यांच्याहस्ते 'एनर्जी लिडरशिप अवॉर्ड २०२५'ने गौरविण्यात आले.

मा. मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांच्या सूचनेनुसार ऊर्जा विभागाच्या अपर मुख्य सचिव आभा शुक्ला यांनी रिसोर्स ॲडेक्वेसी प्लॅन तयार केला आहे. या नियोजनात हरित ऊर्जेवर अधिक भर देण्यात आला आहे. सन २०३० पर्यंत विजेची वाढती मागणी पूर्ण करण्यासाठी तब्बल ३८ हजार मेगावॅट हरित ऊर्जेसह ४५ हजार मेगावॅट विजेची आणखी भर पडणार आहे. राज्यातील नवीकरणीय ऊर्जेची क्षमता १३ टक्क्यांवरून ५२ टक्के होणार आहे. सोबतच सुमारे ३ लाख ३० हजार कोटी रुपयांची गुंतवणूक होणार असून सुमारे ७ लाखांवर रोजगार निर्माण होणार आहेत. यासह पुढील पाच वर्षांत वीज खरेदीमध्ये ८२ हजार कोटी रुपयांची बचत होईल. त्यामुळे येत्या पाच वर्षांत सर्वच वर्गवारीतील वीज दर कमी होत जाणार आहेत.

विद्युत क्षेत्रातील लोकाभिमुख विविध योजना व प्रभावी अंमलबजावणीमुळे प्रत्यक्षात झालेले विविध फायदे आदींच्या निकषांवर सेवानिवृत्त केंद्रीय ऊर्जा सचिव अनिल राजदान यांच्या अध्यक्षतेखाली ११ सदस्यीय राष्ट्रीय निवड समितीने अपर मुख्य सचिव आभा शुक्ला व महावितरणची 'एनर्जी लिडरशिप अवॉर्ड २०२५'साठी निवड केली आहे.

# प्रशिक्षण व सुरक्षा केंद्रात ३६ प्रशिक्षणार्थींचे रक्तदान



▸▸ रक्तदान शिबिरात उपस्थित मुख्य महाव्यवस्थापक अरविंद भादीकर. समवेत अधिकारी व प्रशिक्षणार्थी.

**नाशिक येथील** एकलहरेच्या प्रशिक्षण व सुरक्षा केंद्रात आयोजित आरोग्य तपासणी व रक्तदान शिबिरात २६ जणांनी रक्तदान केले. नामको हॉस्पिटल व नवजीवन रक्तपेढीच्या सहकार्याने या शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

प्रशिक्षण व सुरक्षा केंद्राचे मुख्य महाव्यवस्थापक अरविंद भादिकर यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यकारी अभियंते आनंदराव देशमुख व नरेंद्र सोनवणे, उपकार्यकारी अभियंते चरणसिंग इंगळे व भूपेंद्र गांगुर्डे यांनी हे शिबिर यशस्वी करण्यासाठी प्रयत्न केले. प्रशिक्षणार्थ्यांनी स्वंयस्फुर्तीने पुढाकार घेऊन राबवलेल्या या उपक्रमाचे कौतुक होत आहे.

# ऊर्जा परिवर्तनामुळे विद्युत क्षेत्रात महाराष्ट्र हे देशातील 'रोल मॉडेल'

## परराष्ट्र सेवेतील अधिकाऱ्यांकडून महाराष्ट्राचे कौतुक



भारतीय परराष्ट्र सेवेतील अधिकाऱ्यांना माहिती देताना अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र (महावितरण) व राधाकृष्णन बी. (महानिर्मिती).

**पारंपरिक कोळसा,** नैसर्गिक वायू व तेलावर आधारित विजेऐवजी महाराष्ट्राने सौर ऊर्जेला अधिक प्राधान्य देत ऊर्जा परिवर्तनामध्ये देशात सर्वप्रथम आघाडी घेतली आहे. त्यामुळे महाराष्ट्राच्या विद्युत क्षेत्रात आमुलाग्र सुधारणा दिसून येत आहे. या ऊर्जा परिवर्तनासाठी देशाच्या विद्युत क्षेत्रात महाराष्ट्र हे रोल मॉडेल आहे, असे गौरवोद्गार भारतीय परराष्ट्र सेवेतील अधिकाऱ्यांनी काढले.

महाराष्ट्रातील विद्युत क्षेत्र व विविध सौर ऊर्जा योजनांची माहिती घेण्यासाठी भारतीय परराष्ट्र सेवेतील वरिष्ठ अधिकाऱ्यांनी मुंबई येथील महावितरण व महानिर्मितीच्या सांघिक कार्यालयास भेट दिली. यामध्ये योजना पटेल (न्यूयॉर्क), प्रतिभा पारकर राजाराम, पारमिता त्रिपाठी, अन्कन बॅनर्जी, सी. सुगंध राजाराम तसेच बिश्वदीप डे (टान्झानिया), स्मिता पंत (ताश्कंद) यांचा समावेश होता. यावेळी महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र, महानिर्मितीचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक राधाकृष्णन बी. यांची प्रमुख उपस्थिती होती.

अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांनी सांगितले की, मा. मुख्यमंत्री व ऊर्जामंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनात ऊर्जा विभागाने राज्यातील विजेची वाढती मागणी व पुरवठ्याच्या नियोजनासाठी रिसोर्स ॲडेक्वेसी प्लॅन तयार केला आहे. त्यानुसार सन २०३० पर्यंत तब्बल ३८ हजार मेगावॅट हरित ऊर्जेसह ४५ हजार मेगावॅट विजेची आणखी भर पडणार आहे. राज्यातील नवीकरणीय ऊर्जेची क्षमता १३ टक्क्यांवरून ५२ टक्के होणार आहे. यामध्ये सुमारे ३ लाख ३० हजार कोटी रुपयांची गुंतवणूक होणार असून सुमारे ७ लाख रोजगार निर्माण होणार आहेत. यासह पुढील पाच वर्षांमध्ये वीज खरेदीमध्ये ८२ हजार कोटी रुपयांची बचत होईल. त्यामुळे येत्या पाच वर्षांत सर्वच वर्गवारीतील वीज दर कमी होत जाणार आहे. सोबतच हरित ऊर्जेला प्राधान्य दिल्यामुळे कार्बन डायऑक्साईडचे (सीओटू) उत्सर्जन कमी करण्याच्या उद्दिष्टाला बळ मिळेल.

लोकेश चंद्र म्हणाले, मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० अंतर्गत कृषिपंपांना दिवसा वीजपुरवठा करण्यासाठी विकेंद्रित सौर ऊर्जा प्रकल्पांद्वारे सन २०२६ पर्यंत १६ हजार मेगावॅट विजेची निर्मिती होणार आहे. जगातील ही सर्वात मोठी विकेंद्रित सौर ऊर्जा निर्मिती योजना आहे. या योजनेमुळे राज्यात ६५ हजार कोटी रुपयांची गुंतवणूक होत असून ग्रामीण भागात सुमारे ७० हजार रोजगार संधी उपलब्ध होत आहेत. या योजनेमुळे देशामध्ये सर्वाधिक असलेल्या महाराष्ट्रातील ४५ लाख कृषिपंपांना दिवसा व शाश्वत वीजपुरवठा होणार आहे. आतापर्यंत कार्यान्वित झालेल्या १९७२ मेगावॅट क्षमतेच्या सौर ऊर्जा प्रकल्पांमधून ३६९ उपकेंद्रांद्वारे शेतकऱ्यांना दिवसा वीजपुरवठा करण्यात येत आहे. सोबतच क्रॉस सबसिडीचा बोजा कमी होऊन औद्योगिक व व्यावसायिक वीज दरात घट होण्यास सुरवात झाली आहे, अशी माहिती त्यांनी दिली.

या बैठकीमध्ये महावितरणचे संचालक सचिन तालेवार (संचालन/प्रकल्प), योगेश गडकरी (वाणिज्य), महापारेषणचे संचालक सतीश चव्हाण (संचालन), महानिर्मितीचे संचालक अभय हरणे (प्रकल्प) तसेच कार्यकारी संचालक दिनेश अग्रवाल, किशोर पाटील, विशेष कार्य अधिकारी मंगेश कोहाट व संतोष सांगळे यांची उपस्थिती होती.

# आरोग्य तपासणी शिबिरात ३५८ जणांची मोफत तपासणी

**प्रकाशगड येथे** आयोजित मोफत आरोग्य तपासणी शिबिराला उत्स्फुर्त प्रतिसाद मिळाला. मुंबई सेंट्रल व मीरा रोड येथील वोक्हार्ट हॉस्पिटल यांच्या सहकार्याने घेण्यात आलेल्या या शिबिरात मुख्यालयातील ३५८ अधिकारी-कर्मचाऱ्यांची आरोग्य तपासणी करण्यात आली.

वजन, उंची, रक्तातील साखरेचे प्रमाण व पेशी, रक्तदाब, डॉक्टरांचा सल्ला तसेच त्यांच्या सल्ल्यानुसार इसीजी अशा विविध सुविधा या शिबिरातून उपलब्ध करून देण्यात आल्या होत्या. संचालक (मानव संसाधन) राजेंद्र पवार, मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी संजय ढोके, महाव्यवस्थापक राजेंद्र पांडे, विशेष कार्य अधिकारी मंगेश कोहाट यांच्यासह ३५८ अधिकारी-कर्मचाऱ्यांनी या शिबिरात उपलब्ध सुविधांचा लाभ घेतला. डॉ. शुभम कुलकर्णी, डॉ. प्रज्ञा मोरे, वोक्हार्ट हॉस्पिटलचे संकेश पाटील, प्रसाद निकम, मेडी असिस्टचे अमीत गायकवाड यांचे या शिबिराला सहकार्य लाभले.



प्रकाशगड येथे आयोजित मोफत आरोग्य तपासणी शिबिरात सहभागी संचालक (मानव संसाधन) राजेंद्र पवार, मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी संजय ढोके, महाव्यवस्थापक राजेंद्र पांडे, विशेष कार्य अधिकारी मंगेश कोहाट आदी.

# विद्युत सुरक्षा अभियानाची जागतिक दखल

## इंग्लंडच्या 'वर्ल्ड रेकॉर्ड ऑफ एक्सलन्स' पुरस्काराने सन्मान



'वर्ल्ड रेकॉर्ड ऑफ एक्सलन्स'चे प्रमाणपत्र व स्मृतिचिन्हासह अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र, संचालक (मानव संसाधन) राजेंद्र पवार, कार्यकारी संचालक परेश भागवत, मुख्य महाव्यवस्थापक भूषण कुलकर्णी, विशेष कार्य अधिकारी मंगेश कोहाट.

**शून्य विद्युत** अपघात जनजागृती अभियानातील विक्रमी लोकसहभागाची जागतिक स्तरावर नोंद घेत इंग्लंडमधील 'वर्ल्ड रेकॉर्ड ऑफ एक्सलन्स' पुरस्काराने महावितरणचा सन्मान करण्यात आला. या अभियानाचे मार्गदर्शक अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र तसेच अभियानाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी संचालक (मानव संसाधन) राजेंद्र पवार यांनाही आंतरराष्ट्रीय प्रमाणपत्राने गौरविण्यात आले.

मुंबई येथे आयोजित कार्यक्रमात 'वर्ल्ड रेकॉर्ड ऑफ एक्सलन्स'चे आंतरराष्ट्रीय प्रमाणपत्र व स्मृतिचिन्ह संचालक (मानव संसाधन) राजेंद्र पवार आणि विशेष कार्य अधिकारी मंगेश कोहाट यांनी स्वीकारले. यावेळी प्रख्यात मानसशास्त्रज्ञ डॉ. दिवाकर सुकुल (लंडन), प्रख्यात शास्त्रज्ञ डॉ. मधू कृष्णन (अमेरिका), ज्येष्ठ संपादक व माजी मंत्री राजेंद्र दर्डा यांची प्रमुख उपस्थिती होती. पुरस्काराच्या निवड समितीकडून महावितरणच्या विद्युत सुरक्षेच्या लोकाभिमुख अभियानाचे कौतुक करण्यात आले. यामध्ये वर्ल्ड रेकॉर्ड ऑफ एक्सलन्सचे अध्यक्ष हेनरी आर (युरोप), प्रमुख पाब्लो (इंग्लंड), उपाध्यक्ष संजय पंजवानी, परीक्षक चंद्रशेखर शिंदे यांचा समावेश आहे.

विद्युत सुरक्षा अभियानातील विक्रमी लोकसहभागाची दखल जागतिक स्तरावर घेण्यात आल्याबाबत अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांनी सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांचे कौतुक केले. शून्य विद्युत अपघाताचे उद्दिष्ट हे महावितरणच्या कामाचा दैनंदिन भाग आहे. विविध उपक्रम व कार्यक्रमांद्वारे सातत्याने लोकसंवाद साधून विद्युत सुरक्षेची माहिती देत राहावी असे निर्देश त्यांनी दिले. यावेळी संचालक (मानव संसाधन) राजेंद्र पवार, कार्यकारी संचालक परेश भागवत, मुख्य महाव्यवस्थापक भूषण कुलकर्णी, विशेष कार्य अधिकारी मंगेश कोहाट यांची उपस्थिती होती.

'वर्ल्ड रेकॉर्ड ऑफ एक्सलन्स' ही इंग्लंडमधील जागतिक स्तरावर मान्यताप्राप्त संस्था आहे. या संस्थेने महावितरणच्या विद्युत सुरक्षा अभियानातील लोकसहभाग आंतरराष्ट्रीय विक्रम असल्याची घोषणा केली व मुंबई येथे आयोजित कार्यक्रमात पुरस्कार प्रदान केला. यावेळी युनायटेड किंग्डम, युनायटेड स्टेट्स ऑफ अमेरिका, नेपाळ आणि भारतातील विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

# महावितरणच्या महिला संघाला ४७ व्या राष्ट्रीय बॅडमिंटन स्पर्धेत सुवर्णपदक; दुहेरीतही सुवर्ण

## पुरुष संघाने केली कांस्यपदकाची कमाई

**अखिल भारतीय** विद्युत क्रीडा नियंत्रण मंडळाच्या ४७ व्या राष्ट्रीय बॅडमिंटन २०२५ च्या स्पर्धेत महावितरणच्या महिला संघाने सलग दुसऱ्यांदा सुवर्णपदक पटकावले तर पुरुष संघ कांस्यपदकाचे विजेते ठरले. यासह महिला खेळाडूंनी दुहेरीत सुवर्ण, एकेरीमध्ये रौप्यपदक जिंकत राष्ट्रीय स्पर्धेत वर्चस्व गाजवले. या सर्व खेळाडूंचे महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांनी अभिनंदन केले आहे.

हिसार (हरियाणा) येथे झालेल्या ४७ व्या राष्ट्रीय बॅडमिंटन स्पर्धेत देशभरातली विविध वीज कंपन्यांचे संघ सहभागी झाले होते. महावितरणच्या महिला संघाने स्पर्धेत एकतर्फी वर्चस्व गाजवत अंतिम फेरीत गुजरात संघाला २-० ने पराभूत केले आणि सलग दुसऱ्या सुवर्णपदकाचा मान पटकावला. रितिका नायडू (कर्णधार), अनिता कुलकर्णी, चैत्रा पै, वैष्णवी गांगरकर, राणी पानसरे या खेळाडूंनी ही चमकदार कामगिरी केली. तर चैत्रा पै व रितिका नायडू यांनी दुहेरी महिला गटात सुवर्णपदकाची तर अनिता कुलकर्णी यांनी एकेरी गटात रौप्यपदकाची कमाई केली.

महावितरणच्या पुरुष संघातील भरत वशिष्ठ (कर्णधार), पंकज पाठक, रोहन पाटील, सुरेश जाधव, दिपक नाईकवाडे यांनी चुरशीच्या सामन्यांमध्ये उपांत्य फेरीपर्यंत धडक दिली व स्पर्धेत कांस्यपदक पटकावले. महिला व पुरुष बॅडमिंटन संघाचे प्रशिक्षक म्हणून गुणवंत इप्पर तर संघ व्यवस्थापक म्हणून उपमुख्य औद्योगिक संबंध अधिकारी भूपेंद्र वाघमारे यांनी काम पाहिले.



हिसार (हरियाणा) येथे विद्युत मंडळांच्या राष्ट्रीय बॅडमिंटन स्पर्धेत सुवर्ण, रौप्य व कांस्यपदक मिळवून नेत्रदिपक कामगिरी करणाऱ्या संघातील खेळाडू.

राज्यातील १,४५८ मेगावॅट क्षमतेच्या ४५४ सौर ऊर्जा
दूरदृश्य प्रणालीव्दारे लोकार्पण क
मा. मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवी
या कार्यक्रमाची











ं प्रकल्पांचे मा. प्रधानमंत्री श्री. नरेंद्र मोदी यांच्या हस्ते
करण्यात आले. या कार्यक्रमासाठी
स प्रकाशगड येथे उपस्थित होते.
काही क्षणचित्रे













# महिला वीज कर्मचाऱ्यांनी आरोग्य सांभाळून काम करावे

## -मा. ऊर्जा राज्यमंत्री श्रीमती मेघना साकोरे बोर्डीकर

**मा. मुख्यमंत्री** श्री. देवेंद्र फडणवीस यांनी त्यांच्या सरकारमध्ये प्रमुख पदांवर महिलांना संधी दिली आहे. राज्याच्या मुख्य सचिव पदांसह अनेक विभागांच्या अपर मुख्य सचिव महिलाच आहेत. विजेच्या क्षेत्रांत तर महिला आघाडीवर आहेत. कारण महिला घर सांभाळून ऑफिस सुद्धा तितक्याच ताकदीने सांभाळतात. एकाच वेळी त्या अनेक जबाबदाऱ्या पार पाडतात. तेंव्हा महिला कर्मचाऱ्यांनी त्यांचे आरोग्य सांभाळून काम केले पाहिजे, असे प्रतिपादन मा. ऊर्जा राज्यमंत्री श्रीमती मेघना साकोरे बोर्डीकर यांनी केले.

पुण्यातील गणेशखिंड येथील प्रकाशभवनात आयोजित 'सन्मान सौदामिनींचा' या कार्यक्रमात त्या बोलत होत्या. याप्रसंगी प्रादेशिक संचालक (पुणे) भुजंग खंदारे, मुख्य अभियंते सुनिल काकडे व धर्मराज पेठकर, अधीक्षक अभियंते ज्ञानदेव पडळकर, सिंहाजीराव गायकवाड, युवराज जरग, अमित कुलकर्णी, विजयानंद काळे, संजीव नेहते व अनिल घोगरे यांच्यासह सर्व महिला अभियंता, अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

मा. ऊर्जा राज्यमंत्री श्रीमती मेघना साकोरे बोर्डीकर म्हणाल्या, विजेसारख्या जोखमीच्या क्षेत्रात महिलांना अनेक आव्हानांना सामोरे जावे लागते. तसेच त्यांना त्यांच्या वैयक्तिक अडचणींवरही मात करावी लागते. मात्र महावितरणने महिला कर्मचाऱ्यांना अतिशय चांगले वातावरण तयार करुन दिले आहे. म्हणूनच महिला पुरुषांप्रमाणे त्यांच्या खांद्याला खांदा लावून काम करत आहेत. अशावेळी महिलांनीही स्वत:च्या आरोग्याची काळजी घेऊन ग्राहकसेवेसाठी तत्पर राहावे. कार्यक्रमात ऊर्जा राज्यमंत्र्यांच्या हस्ते उपस्थित महिला कर्मचाऱ्यांचा पुस्तक व गुलाबपुष्प देऊन प्रातिनिधीक स्वरुपात गौरव करण्यात आला. तर वर्षा कारंडे, भक्ती जोशी, स्वागती सोळंकुरे व पूजा मेश्राम या महिला कर्मचाऱ्यांनी मनोगत व्यक्त केले. सूत्रसंचालन दिपश्री सरोदे व सोनाली राठोड-चव्हाण यांनी केले.



▸▸ पुणे येथे आयोजित 'सन्मान सौदामिनींचा' या कार्यक्रमात महिला कर्मचाऱ्यांचा सन्मान करताना मा. ऊर्जा राज्यमंत्री श्रीमती मेघना साकोरे बोर्डीकर. समवेत प्रादेशिक संचालक (पुणे) भुजंग खंदारे व मुख्य अभियंता सुनिल काकडे.

◆◆●◆◆

# सन्मान सौदामिनींचा; महावितरणमधील महिला खऱ्या अर्थाने आदिशक्तीचे रूप

## संचालक (मानव संसाधन) राजेंद्र पवार यांचे प्रतिपादन; मुख्यालयात महिला अधिकारी व कर्मचाऱ्यांचा सन्मान



▸▸ नवरात्र उत्सवानिमित्त 'सन्मान सौदामिनीं'चा या कार्यक्रमात महिला अभियंता, अधिकारी व कर्मचाऱ्यांसमवेत संचालक (मानव संसाधन) राजेंद्र पवार.

**वीजसेवेसारख्या** धकाधकीच्या, जोखमीच्या तांत्रिक क्षेत्रामध्ये महावितरणमध्ये कार्यरत महिला अभियंता, अधिकारी व कर्मचाऱ्यांनी योगदान व क्षमता सिद्ध केली आहे. ही महिला शक्ती खऱ्या अर्थाने आदिशक्तीचे रूप आहे असे गौरवोद्गार संचालक (मानव संसाधन) राजेंद्र पवार यांनी काढले.

नवरात्र उत्सवानिमित्त प्रकाशगड मुख्यालयामध्ये कार्यरत महिला अभियंते, अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या सन्मानार्थ सन्मान सौदामिनींचा या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. व्यासपीठावर कार्यकारी संचालक अपर्णा गिते (सुरक्षा व अंमलबजावणी) व स्वाती व्यवहारे (वित्त) यांची उपस्थिती होती.

संचालक राजेंद्र पवार म्हणाले, एकेकाळी पुरुषांचे क्षेत्र समजल्या जाणाऱ्या वीजक्षेत्रात स्वकर्तृत्वाने भरारी घेणाऱ्या महिला शक्तीचे अस्तित्व खऱ्या अर्थाने प्रकाशमान झाले आहे. महिला अभियंता, अधिकारी व कर्मचाऱ्यांनी अत्यंत प्रभावीपणे व आत्मविश्वासाने महावितरणच्या प्रगतीला हातभार लावला आहे. या महिला शक्तीच्या योगदानाचा सन्मान करण्यासाठी नवरात्रानिमित्त राज्यभरात 'सन्मान सौदामिनींचा' हा कार्यक्रम आयोजित करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले.

कार्यकारी संचालक (वित्त) स्वाती व्यवहारे यांनी सन्मान सौदामिनींच्या आयोजनाचे स्वागत केले. महिलांनी स्वतःसाठी वेळ काढून तब्येतीची जाणीवपूर्वक काळजी घ्यावी, असे आवाहन त्यांनी केले. कार्यकारी संचालक अपर्णा गिते यांनी सांगितले, की परिस्थिती अनुकूल नसतानाही महिलांनी धडपड करणे, प्रसंगी दुर्गा होणे आवश्यक आहे. महिलांना कायदेशीर सल्ला मिळण्यासाठी मार्गदर्शन व प्रबोधन व्यवस्था निर्माण करण्याची गरज असल्याचे त्यांनी सांगितले.

मुख्य अभियंता कविता घरत यांनी नवरात्रीच्या नवरंगाचा उत्साह महिलांच्या आयुष्यात निर्माण व्हावा यासाठी शुभेच्छा दिल्या आणि त्यासाठी महिलांनी स्वतःला सक्षम करण्याची आवश्यकता व्यक्त केली. तर वैशाली तळपलकर यांनी कठीण परिस्थितीत खचून न जाता महिलांनी आत्मविश्वासाने काम करण्याचे आवाहन केले.

कार्यक्रमात मुख्य अभियंता सुचिता गुजर, मुख्य महाव्यवस्थापक (वित्त) स्वाती जानोरकर, सुरक्षा रक्षक स्वाती मोहिते, सहाय्यक महाव्यवस्थापक (मानव संसाधन) प्रांजली कोलारकर यांचा प्रातिनिधिक सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अभिजित नातू यांनी केले तर उपकार्यकारी अभियंता डॉ. संतोष पाटणी यांनी आभार मानले.

◆◆●◆◆

## भंडारा शहर उपकेंद्राला आयएसओ मानांकन



आयएसओ मानांकन प्रमाणपत्रासमवेत गोंदिया परिमंडलाचे मुख्य अभियंता सुहास रंगारी, भंडारा मंडलाचे अधीक्षक अभियंता राजेंद्र गिरी, कार्यकारी अभियंता डॉ. गजानन जैस्वाल आदी.

**गोंदिया** परिमंडळातील भंडारा शहर (टाकळी) येथील ३३/११ केव्ही उपकेंद्राला एकाच वेळी आयएसओची चार मानांकने मिळाली आहेत. यात आयएसओ ९००१:२०१५ (गुणवत्ता व्यवस्थापन प्रणाली), आयएसओ १४००१:२०१५ (पर्यावरण व्यवस्थापन प्रणाली), आयएसओ ५०००१:२०१८ (ऊर्जा व्यवस्थापन प्रणाली) आणि आयएसओ ४५००१:२०१८ (व्यावसायिक आरोग्य आणि सुरक्षा व्यवस्थापन प्रणाली) या मानांकनांचा समावेश आहे.

या मानांकनामुळे भंडारा शहर उपकेंद्र हे गोंदिया परिमंडलातील दुसरे आयएसओ मानांकित उपकेंद्र ठरले आहे. यापूर्वी, भंडारा विभागातील आयपीडीएस उपकेंद्राला आयएसओ ९००१:२०१५ मानांकन मिळाले आहे. भंडारा विभागाचे कार्यकारी अभियंता डॉ. गजानन जैस्वाल यांच्या नेतृत्वाखाली अतिरिक्त कार्यकारी अभियंता नुनदेव भुसारी, राम पराडकर, सहायक अभियंता जगदीश मते, अभय बन्सोड, दृष्यंत खोब्रागडे, रोहन कऱ्हाडे, तसेच यंत्रचालक अमर खराबे, गोपाल माकडे, देवचंद पिल्लेवान, नंदकिशोर झाडे आणि इतर कर्मचाऱ्यांनी केलेल्या अथक परिश्रमामुळे हे यश मिळाले.

गोंदिया परिमंडळाचे मुख्य अभियंता सुहास रंगारी आणि भंडारा विभागाचे अधीक्षक अभियंता राजेंद्र गिरी यांच्या मार्गदर्शनाखाली ही कामगिरी करण्यात आली.

## कार्यालयीन सुधारणा अभियानात कल्याण मंडल-एकला प्रथम क्रमांक

### कोकण प्रादेशिक विभागाला द्वितिय तर कल्याण परिमंडलला तृतिय क्रमांक



उपमुख्यमंत्री मा. श्री. एकनाथ शिंदे यांच्या हस्ते प्रमाणपत्र स्विकारताना कल्याण परिमंडलाचे मुख्य अभियंता चंद्रमणी मिश्रा.

**शंभर दिवसांच्या** कार्यालयीन सुधारणा अभियानाच्या दुसऱ्या टप्प्यातील जिल्हा स्तरावरील कार्यालयांच्या गटात कल्याण मंडल-एक कार्यालयाने प्रथम क्रमांक पटकावला आहे. तर या स्पर्धेत राज्य आणि विभाग पातळीवर अनुक्रमे कोकण प्रादेशिक विभाग कार्यालयाने द्वितिय तर कल्याण परिमंडल कार्यालयाने तृतिय क्रमांक मिळवला.

स्वातंत्र्य दिनानिमित्त ठाणे जिल्हाधिकारी कार्यालयात झालेल्या कार्यक्रमात मा. उपमुख्यमंत्री श्री. एकनाथ शिंदे यांच्या हस्ते प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले. राज्य पातळीवरील स्पर्धेत कोकण प्रादेशिक कार्यालयाचा दुसरा क्रमांक, विभागीय पातळीवर कल्याण परिमंडल कार्यालयाचा तिसरा क्रमांक, तर जिल्हा पातळीवर कल्याण मंडल कार्यालय-एकचा पहिला क्रमांक आला. ठाणे जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित समारंभात अलोक गांगुर्डे, महाव्यवस्थापक (वित्त व लेखा) यांनी कोकण प्रादेशिक कार्यालयाकडून, कल्याण परिमंडळाचे मुख्य अभियंता चंद्रमणी मिश्रा यांनी परिमंडल कार्यालयाच्या वतीने तर अधिक्षक अभियंता विजय फुंदे यांनी कल्याण मंडल-एक कार्यालयाच्या वतीने मा. उपमुख्यमंत्री श्री. एकनाथ शिंदे यांच्या हस्ते प्रमाणपत्र स्विकारली.

## वीज चोरीची एफआयआर प्रक्रिया कठोर करा- कार्यकारी संचालक अपर्णा गिते

**वीज चोरीच्या** प्रकरणांमध्ये त्वरित, नियमानुसार आणि अत्यंत कठोर कारवाई करा. नव्याने बसवण्यात येत असलेल्या स्मार्ट मीटरवरही विशेष लक्ष ठेवण्याच्या सूचना कार्यकारी संचालक (दक्षता व अंमलबजावणी) अपर्णा गिते यांनी दिल्या.

नागपूर प्रादेशिक कार्यालयांतर्गत दक्षता व अंमलबजावणी विभागाच्या आढावा बैठकीत त्या बोलत होत्या. या बैठकीला नागपूर परिमंडलाचे मुख्य अभियंता दिलीप दोडके, नागपूर प्रादेशिक कार्यालयाचे उपसंचालक (दक्षता व अंमलबजावणी) सुनील थापेकर, नागपूर विभागातील सर्व भरारी पथके व क्षेत्रीय दक्षता युनिटचे प्रमुख उपस्थित होते. अपर्णा गिते म्हणाल्या, वीज चोरीच्या प्रकरणांची एफआयआर



नागपूर येथे आढावा बैठकीत मार्गदर्शन करताना कार्यकारी संचालक अपर्णा गिते.

केवळ ऑनलाइन न नोंदवता ऑफलाइन नोंदवणेही आवश्यक आहे. मागील आर्थिक वर्षापासून प्रलंबित असलेल्या एफआयआर कायदेशीर प्राधिकरणाच्या मदतीने त्वरित दाखल करावेत. आरोपीचा माग काढण्यासाठी आधार आणि मतदार ओळखपत्रासारख्या अचूक पत्त्याच्या पुराव्यांचा वापर करणे अनिवार्य असल्याचेही त्यांनी सांगितले.

ई-कोर्ट ॲपचा वापर, मागील न्यायिक निर्णय आणि विद्युत कायदा-२००३ च्या कलम १३५ अंतर्गत दाखल झालेल्या प्रकरणांचा सखोल अभ्यास करावा, एफआयआरसह चोरीचा जप्त केलेला मुद्देमाल संबंधित पोलीस स्टेशनकडे तातडीने सुपूर्द करावा, प्रलंबित मुद्देमाल हस्तांतरित करण्यासाठी सविस्तर पत्र जारी करण्याचे आदेश त्यांनी यावेळी दिले. वीज चोरी आणि स्मार्ट मीटर टॅम्परिंगच्या प्रकरणांमध्ये शक्य असेल तिथे भारतीय न्याय संहिता कलम ३२४ चा वापर, एमडीएमएस डेटाचे विश्लेषण करून स्मार्ट मीटर तपासणीची संख्या वाढवणे, दक्षता विभागाच्या कामात आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर आणि मूल्यांकन पद्धतीत सुधारणा करण्याचे निर्देश त्यांनी दिले.

# शंभर दिवस कार्यालयीन सुधारणा अभियानात पुणे प्रादेशिक कार्यालय प्रथम

## बारामती परिमंडलास द्वितीय तर वाडिया व चाकण एमआयडीसी उपविभागालाही प्रशस्तीपत्रक



▸▸ १०० दिवसांच्या कार्यालयीन सुधारणा अभियानाच्या दुसऱ्या टप्प्यातील विभाग स्तरावरील प्रथम पुरस्कार मा. उपमुख्यमंत्री श्री. अजित पवार यांच्या हस्ते स्वीकारताना प्रादेशिक संचालक भुजंग खंदारे.

**सामान्य माणूस** केंद्रस्थानी ठेवून कार्यक्षमतेला पारदर्शकतेची जोड द्यावी. इच्छाशक्ती असेल तर बदल घडवता येतो असे सांगून शासन चांगले काम करणाऱ्यांच्या कायम पाठिशी असल्याची ग्वाही मा. उपमुख्यमंत्री श्री. अजित पवार यांनी दिली. प्रशासनातील लोकाभिमुखतेसाठी मा. मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांनी जाहिर केलेल्या १०० दिवसांच्या कार्यालयीन सुधारणा अभियानाच्या दुसऱ्या टप्प्यातील विभाग स्तरावरील पुरस्कार वितरण कार्यक्रमात ते बोलत होते.

पुणे येथील विधानभवन सभागृहात विभागीय पातळीवर झालेल्या १०० दिवस कार्यालयीन सुधारणा अभियान पुरस्काराचे मा. उपमुख्यमंत्री श्री. अजित पवार यांच्या हस्ते वितरण करण्यात आले. यात पुणे प्रादेशिक संचालक कार्यालयास प्रथम तर बारामती परिमंडल कार्यालयाने द्वितीय क्रमांक पटकावला. सोबतच वाडिया उपविभाग व चाकण एमआयडीसी उपविभागांनीही या स्पर्धेत प्रशस्तीपत्रक मिळवले. प्रादेशिक संचालक भुजंग खंदारे व बारामती परिमंडलाचे मुख्य अभियंता धर्मराज पेठकर, वाडिया उपविभागाचे अतिरिक्त कार्यकारी अभियंता सुनिल गवळी, चाकण उपविभागाचे उपकार्यकारी अभियंता प्रकाश शेळके यांचा यावेळी प्रमाणपत्र देऊन गौरव करण्यात आला. कार्यक्रमाला विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार, जिल्हाधिकारी जितेंद्र डूडी, मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील, पोलीस अधीक्षक संदिपसिंग गिल, पुणे परिमंडलाचे मुख्य अभियंता सुनिल काकडे यांची प्रमुख उपस्थिती होती.

# शंभर दिवस कार्यालयीन सुधारणा अभियानात नागपूर परिमंडल अव्वल



▸▸ शंभर दिवसांच्या कार्यालयीन सुधारणा अभियानाच्या दुसऱ्या टप्प्यातील विभाग स्तरावरील प्रथम क्रमांकाचा पुरस्कार मा. महसूल मंत्री श्री. चंद्रशेखर बावनकुळे यांच्या हस्ते स्वीकारताना मुख्य अभियंता दिलीप दोडके.

**मा. मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस** यांनी जाहिर केलेल्या १०० दिवसांच्या कार्यालयीन सुधारणा अभियानाच्या दुसऱ्या टप्प्यातील विभाग स्तरावरील कार्यालयांच्या गटात नागपूर परिमंडल कार्यालयाने राज्यात प्रथम क्रमांक पटकावला आहे. तर नागपूर प्रादेशिक संचालक कार्यालयालाही या मोहिमेत तृतीय क्रमांक मिळाला आहे.

स्वातंत्र्य दिनानिमित्त विभागीय आयुक्त कार्यालयाच्या प्रांगणात आयोजित विशेष कार्यक्रमात मा. महसूल मंत्री श्री. चंद्रशेखर बावनकुळे यांच्या हस्ते मुख्य अभियंता दिलीप दोडके यांना प्रशस्तिपत्र देऊन गौरवण्यात आले. यावेळी खासदार श्यामकुमार बर्वे, विभागीय आयुक्त विजयलक्ष्मी बिदरी, अतिरिक्त आयुक्त माधवी चवरे खोडे, पोलीस आयुक्त डॉ. रवींद्र सिंगल, विशेष पोलीस महानिरीक्षक संदीप पाटील, महापालिका आयुक्त डॉ. अभिजित चौधरी, नागपुर सुधार प्रन्यासचे सभापती संजय मीना, महामेट्रोचे व्यवस्थापकीय संचालक श्रावण हर्डीकर, जिल्हाधिकारी डॉ. विपीन इटनकर, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विनायक महामुनी, पोलीस सहआयुक्त नवीनचंद्र रेड्डी, पोलीस अधीक्षक हर्ष पोद्दार, स्वातंत्र्यसैनिक व ज्येष्ठ नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# क्षमतावर्धित रोहित्राचे मा. पालकमंत्री श्री. चंद्रकांत पाटील यांच्या हस्ते लोकार्पण



▸▸ क्षमतावर्धित रोहित्राचे लोकार्पण करताना सांगली जिल्ह्याचे मा. पालकमंत्री श्री. चंद्रकांत पाटील. समवेत आमदार डॉ. सुरेश खाडे, मराविमं सूत्रधारी कंपनीच्या स्वतंत्र संचालिका नीता केळकर.

**मिरज तालुक्यातील** ३३/११ केव्ही कानडवाडी उपकेंद्रातील क्षमतावर्धित १० एमव्हीए रोहित्राचे लोकार्पण मा. उच्च व तंत्र शिक्षण, संसदीय कार्यमंत्री तसेच सांगली जिल्ह्याचे पालकमंत्री श्री. चंद्रकांत पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. या रोहित्रामुळे चार हजार ग्राहकांना अधिक दर्जेदार व गुणवत्तापूर्ण वीज सेवा मिळण्यास मदत होईल.

यावेळी आमदार डॉ. सुरेश खाडे, मराविमं सूत्रधारी कंपनीच्या स्वतंत्र संचालिका नीता केळकर, कोल्हापूर परिमंडलाचे मुख्य अभियंता स्वप्नील काटकर, सांगली मंडलाचे अधीक्षक अभियंता अमित बोकील, सांगली ग्रामीणचे कार्यकारी अभियंता सुरेश सवाईराम, सांगली शहर विभागाचे कार्यकारी अभियंता आशिष मेहता, चेम्बर ऑफ कॉमर्सचे संचालक रमेश आरवाडे आदी उपस्थित होते.

# वीजग्राहकांचे समाधान हे महावितरणच्या अभियंत्यांचे कर्तव्य अन् परमार्थ

## राष्ट्रीय अभियंता दिन उत्साहात



▸▸ प्रकाशगड येथे राष्ट्रीय अभियंता दिनाच्या कार्यक्रमात भारतरत्न डॉ. मोक्षगुंडम विश्वेश्वरय्या यांना अभिवादन करताना संचालक (प्रकल्प/संचालन) सचिन तालेवार, संचालक (मानव संसाधन) राजेंद्र पवार, कार्यकारी संचालक प्रसाद रेशमे, धनंजय औंढेकर, परेश भागवत, प्रादेशिक संचालक भूजंग खंदारे.

**मूलभूत गरज** बनलेल्या वीजक्षेत्रामध्ये महावितरण अभियंत्यांच्या कामगिरीचा उज्वल व ऐतिहासिक वारसा आहे. राज्याच्या प्रगतीमध्ये योगदान देण्यासह अंधारलेल्या वाटा, घरे प्रकाशाने उजळण्याचे भाग्य महावितरणच्या अभियंत्यांना मिळाले आहे. वीजजोडणीद्वारे विजेचा लखलखाट झाल्यावर घरगुती, शेतकरी, औद्योगिक, व्यावसायिक व इतर ग्राहकांच्या सामाजिक व आर्थिक प्रगतीला सुरवात होते. या सेवेचा ग्राहकांना जो आनंद व समाधान मिळतो, तोच खरा परमार्थ आहे आणि ग्राहकांना कायम समाधान देणारी सेवा पुरवणे आपले कर्तव्य आहे, असे मार्गदर्शन महावितरणच्या संचालकांनी मनोगतांमधून केले.

भारतरत्न डॉ. मोक्षगुंडम विश्वेश्वरय्या यांच्या जयंती निमित्ताने प्रकाशगड मुख्यालयात राष्ट्रीय अभियंता दिनाच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी प्रमुख वक्ते म्हणून संचालक (प्रकल्प/संचालन) सचिन तालेवार, संचालक (मानव संसाधन) राजेंद्र पवार, सहव्यवस्थापकीय संचालक दिलीप जगदाळे (कोकण विभाग), कार्यकारी संचालक प्रसाद रेशमे, धनंजय औंढेकर, परेश भागवत, दत्तात्रेय पडळकर, प्रादेशिक संचालक (पुणे) भुजंग खंदारे यांची व्यासपीठावर उपस्थिती होती.

संचालक सचिन तालेवार म्हणाले, महावितरणचे अभियंते व कर्मचाऱ्यांनी डोंगरदऱ्या, अतिदुर्गम भागात वीजयंत्रणा उभारून राज्याच्या प्रगतीला वेग दिला आहे. वीजग्राहकांशी प्रकाशाचे नाते जोडले आहे. हे नाते ग्राहकसेवेतून भक्कम व अतूट राहावे यासाठी सामाजिक जबाबदारीच्या जाणीवेने अभियंता म्हणून कार्यरत राहावे.

संचालक राजेंद्र पवार म्हणाले, कोणत्याही व्यक्तीचा किंवा प्रदेशाचा सामाजिक व आर्थिक विकास हा विजेअभावी शक्य नाही. वीज क्षेत्र अनन्यसाधारण महत्वाचे आहे. या क्षेत्रात काम करताना कंपनीहित व ग्राहकहितासाठी योगदान देत राहणे, ही आपली महत्वाची जबाबदारी आहे. अत्यंत प्रतिकूल व खडतर परिस्थितीत महावितरणचे अभियंते व कर्मचारी वीज सेवा देण्यासाठी ज्या धैर्याने, गतीने, सांघिकतेने काम करतात त्याचाही राज्यात नावलौकिक आहे.

सहव्यवस्थापकीय संचालक दिलीप जगदाळे म्हणाले, अभियंत्याचा वारसा हा प्राचीन काळातील विश्वकर्मा यांच्यापासून ते डॉ. मोक्षगुंडम विश्वेश्वरय्या यांच्यापर्यंतचा आहे. नव तंत्रज्ञानातून हा वारसा सध्याच्या अभियंता पिढीकडूनही आणखी समृद्ध होत आहे. यावेळी कार्यकारी संचालक प्रसाद रेशमे, धनजंय औंढेकर, परेश भागवत, दत्तात्रेय पडळकर, प्रादेशिक संचालक भूजंग खंदारे यांनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन उपकार्यकारी अभियंता डॉ. संतोष पाटणी यांनी केले व आभार मानले. कार्यक्रमाला क्षेत्रीय मुख्य अभियंते, अधीक्षक अभियंते तसेच मुख्यालयातील अभियंते, अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

# महत्त्वाचे प्रकल्प युद्धस्तरावर पूर्ण करावेत

## कार्यकारी संचालक (प्रकल्प) प्रसाद रेशमे यांचे निर्देश

**वीज वितरण** प्रणालीमध्ये आमूलाग्र सुधारणा घडवून आणण्यासाठी आणि वितरण प्रणालीतील तांत्रिक व वाणिज्यिक हानी कमी करण्याच्या उद्देशाने, कृषी व गैर-कृषी वाहिन्यांचे विलगीकरण तसेच मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना-२.० अंतर्गत उपकेंद्र सक्षमीकरणाच्या कामांना युद्धस्तरावर गती द्यावी. मुख्यालयाने निश्चित केलेल्या वेळापत्रकानुसार ही सर्व कामे तातडीने आणि सर्वोच्च गुणवत्ता मानकांचे पालन करून पूर्ण करावीत, असे निर्देश कार्यकारी संचालक (प्रकल्प) प्रसाद रेशमे यांनी दिले.

नागपूर परिमंडलातांर्गत सुरू असलेल्या तांत्रिक प्रकल्पांच्या प्रगतीचा आढावा घेण्यासाठी आयोजित बैठकीत ते बोलत होते. मुख्य अभियंता दिलीप दोडके, अधीक्षक अभियंते अमित परांजपे, संजय वाकडे, स्मिता पारखी, मंगेश वैद्य यावेळी उपस्थित होते. कार्यकारी संचालक प्रसाद रेशमे म्हणाले, कृषी व गैर-कृषी वाहिन्यांच्या विलगीकरणामुळे थेट वीज ग्राहकांना तांत्रिक व गुणात्मक फायदे मिळतील. विलगीकरण पूर्ण झाल्यावर गैर-कृषी ग्राहकांना स्वतंत्र वाहिनीद्वारे वीजपुरवठा मिळेल. यामुळे वितरण प्रणालीवरील ताण कमी होऊन तांत्रिक हानी लक्षणीयरीत्या कमी होईल. हानी कमी झाल्यास, त्याचा अप्रत्यक्ष लाभ दीर्घकाळात वीज दराच्या स्थैर्यासाठी उपयुक्त ठरेल. वाहिनी विलगीकरणामुळे एकूण वीज पुरवठा खंडित वेळेत मोठी घट होईल. मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० अंतर्गत कामाच्या अंमलबजावणीतील स्थानिक अडचणी सोडवण्यासाठी समन्वय ठेवावा, असे स्पष्ट निर्देश प्रसाद रेशमे यांनी दिले.

या बैठकीला नागपूर जिल्ह्यातील सर्व कार्यकारी अभियंते तसेच वर्धा व नागपूर जिल्ह्यात कार्यरत एजन्सीचे प्रतिनिधी उपस्थित होते.



▸▸ आढावा बैठकीला मार्गदर्शन करतांना कार्यकारी संचालक प्रसाद रेशमे. सोबत मुख्य अभियंता दिलीप दोडके व इतर अधिकारी

## राजेश भारस्कर शासकीय विश्वकर्मा गुणवंत कामगार पुरस्काराने सन्मानित



मान्यवरांच्या हस्ते विश्वकर्मा गुणवंत कामगार पुरस्कार स्वीकारताना प्रधान यंत्रचालक राजेश उर्फ गुणवंत वसंतराव भारस्कर.

**अकोला परिमंडलातील** वाशीम मंडलमध्ये ३३ केव्ही आसेगाव उपकेंद्रात कार्यरत असलेले प्रधान यंत्रचालक राजेश ऊर्फ गुणवंत वसंतराव भारस्कर यांना विश्वकर्मा गुणवंत कामगार या कामगार विश्वातील मानाच्या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. त्यांना हा पुरस्कार राज्याचे तत्कालिन मा. राज्यपाल सि. पी. राधाकृष्णन यांच्या हस्ते देवून गौरविण्यात आले. स्मृतिचिन्ह, पदक, मानपत्र व २५ हजार रुपये रोख असे या पुरस्काराचे स्वरूप आहे.

नोकरी सांभाळून विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या कर्मचाऱ्यांना हा पुरस्कार दिला जातो. कामगार कल्याण मंडळामार्फत मुंबईतील प्रभादेवी येथील हुतात्मा बाबू गेणू गिरणी कामगार भवनात पुरस्कार वितरण कार्यक्रम झाला. व्यासपीठावर मा. कामगार मंत्री आकाश फुंडकर, मा. कामगार राज्यमंत्री ॲड.आशिष जयस्वाल, कामगार कल्याण मंडळ आयुक्त रविराज इळवे, आमदार श्रीमती मनिषा कायंदे यांची उपस्थिती होती.

## हार्दिक अभिनंदन!




कु. समृद्धी भरत संकपाळ

**कु. समृद्धी संकपाळ** हिने कॅट परिक्षेत उत्तुंग यश मिळवत विशाखापट्टणम येथील इंडियन इन्स्टिट्युट ऑफ मॅनेजमेंट (IIM) या नामांकित संस्थेत पदव्युत्तर पदवीसाठीचा प्रवेश निश्चित केला आहे. ती भांडुप परिमंडलातील मुलुंडस्थित एचडीआयएल उपकेंद्रात कार्यरत प्रधान यंत्रचालक भरत रामचंद्र संकपाळ यांची कन्या आहे.



कु. तनया गोपाळ पाटील

**कु. तनया गोपाळ पाटील** हिची रांची येथील इंडियन इन्स्टिट्युट ऑफ मॅनेजमेंट (IIM) या नामांकित संस्थेत इंटिग्रेटेड एबीए या पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी निवड झाली आहे. ती पुणे परिमंडलातील मार्केटयार्ड उपविभागात कार्यरत अतिरिक्त कार्यकारी अभियंता गोपाळ पाटील यांची कन्या आहे.



कु. अनुजा संतोष भावसार

**कु. अनुजा संतोष भावसार** हिने डिफार्मसी परीक्षेत ९०.०९ टक्के गुण मिळवून राज्यात अव्वल क्रमांक पटकावला आहे. ती लातूर येथील दयानंद फार्मसी महाविद्यालयाची विद्यार्थिनी असून लातूर परिमंडलातील माजलगाव उपविभागात कार्यरत वरिष्ठ यंत्रचालक संतोष बाबुराव भावसार यांची कन्या आहे.

## विशाल नाईकनवरे यांचा गौरव



विशाल नाईकनवरे

**राष्ट्रीय विद्युत सुरक्षा** सप्ताहामध्ये विद्युत सुरक्षेबाबत जनजागृतीचे उल्लेखनीय काम केल्याबद्दल राहूलनगर शाखेचे सहाय्यक अभियंता विशाल नाईकनवरे यांचा उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाच्या वतीने आयोजित कार्यक्रमात प्रशस्तीपत्रक देऊन गौरविण्यात आले आहे. हा सप्ताह २६ जून ते २ जुलै २०२५ या कालावधीत घेण्यात आला होता.

## शरद बडे याची भारतीय संघात निवड



कु. शरद बडे

**जपान** येथे होणाऱ्या आशियाई डॉजबॉल स्पर्धेत सहभागी होणाऱ्या भारतीय संघात शरद बडे याची निवड झाली आहे. तो लातूर परिमंडलातील उमरगा उपविभागात कार्यरत निम्नस्तर लिपिक (लेखा) नवनाथ बडे यांचा चिरंजिव आहे.

## दहावीतील गुणवंत



नाव – **सोहम संदेश कोळेकर**
गुण – ९१.४० टक्के
पालक – संदेश कोळेकर
वरिष्ठ यंत्रचालक, कळे उपविभाग,
कोल्हापूर ग्रामीण विभाग-१



नाव – **रोहीत शैलेश चरडे**
गुण – ९५.८० टक्के
पालक – शैलेश रामरावजी चरडे
वरिष्ठ तंत्रज्ञ, ग्रामिण १ शाखा,
आर्वी उपविभाग, वर्धा मंडल

## मंगेश समदुरकर निवड समितीच्या सदस्यपदी



मंगेश समदुरकर

**मंगेश समदुरकर** यांची विदर्भ क्रिकेट संघटनेच्या राष्ट्रीय निवड समिती सदस्यपदी निवड झाली आहे. १४, १६ आणि १९ वर्षांखालील क्रिकेट संघांतील खेळाडुंच्या निवडीसाठीची ही समिती आहे. समदुरकर यांनी यापूर्वी रणजी करंडक स्पर्धेत विदर्भ संघाचे आणि १९ वर्षांखालील भारतीय क्रिकेट संघाचे प्रतिनिधित्व केले आहे. त्यांनी प्रशिक्षक आणि पंच म्हणूनही काम पाहिले आहे. सध्या ते नागपूर परिमंडलातील कॉंग्रेसनगर विभागात लिपिक (लेखा) म्हणून कार्यरत आहेत.

# मा. मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते

## ३५ मेगावॅट क्षमतेच्या ११ सौर प्रकल्पाचे लोकार्पण



▸▸ यवतमाळ जिल्ह्यातील ३५ मेगावॅट क्षमतेच्या ११ सौर प्रकल्पाचे लोकार्पण करताना मा. मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस. समवेत मृद व जलसंधारण मंत्री संजय राठोड, महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे.

**शेतकऱ्यांच्या** विकासासाठी राज्य शासन सातत्याने कार्यरत असून शेतकऱ्यांना शाश्वत आणि दिवसा वीज पुरवठा करण्यासाठी राज्यात मागेल त्याला सौर कृषीपंप, मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना-२.० या महत्वाकांक्षी योजनांची अंमलबजावणी वेगाने करण्यात येत आहे. डिसेंबर-२०२६ पर्यंत जिल्ह्यातील सर्व शेतकऱ्यांना दिवसा १२ तास मोफत वीज उपलब्ध होणार आहे, असे प्रतिपादन मा. मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांनी केले.

यवतमाळ येथे विविध विकास कामांच्या लोकार्पण, भूमिपूजन आणि शुभारंभ कार्यक्रमात ते बोलत होते. सौर कृषी वाहिनी योजना - २.० अंतर्गत पूर्ण झालेल्या आणि ३५ मेगावॅट क्षमतेच्या जिल्ह्यातील ११ सौर प्रकल्पाचे लोकार्पण त्यांच्या हस्ते झाले. मृद व मा. जलसंधारण मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री संजय राठोड, मा. महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, मा. आदिवासी विकास मंत्री अशोक उईके, खासदार संजय देशमुख, आमदार राजू तोडसाम, आमदार किसनराव वानखेडे, सईताई डहाके, संजय देरकर, श्याम कोडे, आदिवासी विकास विभागाचे सचिव विजय वाघमारे, विभागीय आयुक्त श्वेता सिंघल, जिल्हाधिकारी विकास मीना आदी यावेळी उपस्थित होते.

# अनुसुचित जाती कल्याण समितीच्या हस्ते विद्युत सहाय्यकांना नियुक्तीपत्रे

## समितीप्रमुख आमदार नारायण कुचे यांनी केले कौतुक

**विद्युत सहायकपदी** निवड झालेल्या उमेदवारांना अनुसुचित जाती कल्याण समितीचे प्रमुख तथा आमदार नारायण कुचे व समितीच्या इतर सदस्यांच्या उपस्थित नियुक्तीपत्रे देण्यात आली. पुणे मनपा सभागृहात झालेल्या कार्यक्रमात ५६ मागासवर्गिय उमेदवारांना समितीच्या हस्ते नियुक्ती आदेश देण्यात आले आले. निर्देशाचे तातडीने पालन केल्याबद्दल समितीने महावितरणचे कौतुक केले आहे.

समितीप्रमुख आमदार नारायण कुचे म्हणाले, नविन भरती प्रक्रियेतील उमेदवारांना तातडीने नियुक्त्या द्या, असे निर्देश दिल्यानंतर अवघ्या २४ तासांत महावितरणने तत्परतेने सर्व उमेदवारांना नियुक्त्या दिल्या. पुणे परिमंडलात निवड झालेल्या २८१ उमेदवारांपैकी ५६ उमेदवार अनुसुचित जातीचे आहेत हे महत्वाचे. ही सर्व सामान्य कुटुंबातील मुले-मुली आहेत. या मुलांनी आता संधीचे सोने करावे असे आवाहन उमेदवारांना करताना महावितरणप्रमाणे इतर विभागांनीही अशीच तत्परता दाखवली पाहिजे असे त्यांनी सांगितले. तर समिती सदस्य तथा विधानपरिषद सदस्य अमित गोरखे यांनीही महावितरणच्या तत्परतेचे कौतुक केले.



▸▸ अनुसुचित जाती कल्याण समितीप्रमुख आमदार नारायण कुचे, सदस्य आमदार अमित गोरखे यांचेसह नवनियुक्त विद्युत सहाय्यक.

(पान क्र. १६ वरून) **मा. प्रधानमंत्री श्री. नरेंद्र मोदी यांच्या हस्ते...**

पुणे जिल्ह्यातील आंबेगाव तालुक्यातील माई वस्ती पेठ येथील माधुरी धुमाळ यांनी पीएम कुसुम-सी अर्थात मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना-२.० या योजनेत दहा मेगावॅट क्षमतेचा सौर ऊर्जा प्रकल्प १० एकर मध्ये उभारला आहे. या परिसरातील शेतकऱ्यांना दिवसा वीज मिळत असून शेतकऱ्यांच्या उत्पन्नामध्ये खूप मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे. वार्षिक पंधरा लाख उत्पन्न या प्रकल्पातून मिळत असल्याचे त्यांनी सांगितले.

धुळे जिल्ह्यातील शिरपूर तालुक्यातील वाकवड येथील चंदू पावरा या शेतकऱ्यांने पीएम कुसुम-बी अर्थात मागेल त्याला सौर कृषी पंप योजनेमध्ये ७.५ एचपी क्षमतेचा सौर कृषिपंप बसवला. त्यामुळे दिवसा वीज उपलब्ध होऊन पाण्याच्या उपलब्धतेमुळे मका, गहू, भुईमूग या पिकांची पेरणी केली जात असल्याचे त्यांनी सांगितले.

सातारा जिल्ह्यातील गोपाळ महल्ले यांनी पीएम कुसुम-सी अर्थात मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना-२.० या योजनेचा लाभ घेतला आहे. या सर्व प्रकल्पांमुळे ग्रामपंचायतीला दरवर्षी पाच लाख रुपये मिळत असून या शेतकऱ्यांनी सतराशे लोकांना वीज पुरवठा केल्यामुळे शेतकऱ्यांची विजेची समस्या सुटली. यामुळे या भागात दिवसा वीज उपलब्ध होत असल्यामुळे आनंदी असल्याचे त्यांनी सांगितले.

**राज्याचा देशात प्रथम क्रमांक**

पीएम कुसुम-सी अर्थात मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना-२.० या योजनेत सहा लाख शेतकऱ्यांना दिवसा वीज पुरवठा होत आहे. यामुळे ३२.०८ लाख एकर जमीन ओलिताखाली आली आहे. तसेच इतर विविध योजनेतून राज्यात आतापर्यंत ६ लाख ४६ हजार ६९४ सौर कृषी पंप बसविण्यात आले असून राज्याने देशात प्रथम क्रमांक मिळवला आहे. या योजनेमुळे २०.९५ लाख एकर जमीन ओलिताखाली आली आहे.

## मा. प्रधानमंत्री श्री. नरेंद्र मोदी यांच्या हस्ते आणि मा. मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत राज्यातील २,४५८ मेगावॅट क्षमतेच्या ४५४ सौर ऊर्जा प्रकल्पांचे लोकार्पण

### प्रधानमंत्री यांनी सौर ऊर्जा प्रकल्पातील लाभार्थ्यांशी साधला संवाद




**सौर ऊर्जा** प्रकल्पांमुळे शेतीला दिवसा वीज उपलब्ध होत आहे, ज्यामुळे शेतकऱ्यांचे आर्थिक उत्पन्न दुप्पट होत आहे. मात्र शेतकऱ्यांनी नैसर्गिक शेतीवर भर देऊन कमी खर्चात जास्त उत्पन्न देणाऱ्या पीक पद्धतीचा वापर करावा. शेतीचे आरोग्य संवर्धन उपाय होणे, ही काळाची गरज आहे. या सौर ऊर्जा प्रकल्पातून मोठ्या प्रमाणात रोजगार निर्मिती होत असल्याचे मा. प्रधानमंत्री श्री. नरेंद्र मोदी यांनी सांगितले. दूरदृश्य प्रणालीद्वारे मा. प्रधानमंत्री श्री. नरेंद्र मोदी यांनी राज्यातील २,४५८ मेगावॅट क्षमतेच्या ४५४ सौर ऊर्जा प्रकल्पाचे लोकार्पण केले. मा. मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यावेळी उपस्थित होते.

राजस्थानातील बांसवाडा येथे ऊर्जा तसेच विविध विकास योजनांचा लोकार्पण कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमाचे ऑनलाईन प्रक्षेपण प्रकाशगड येथून करण्यात आले. यावेळी मा. मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस, महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र, महानिर्मितीचे व्यवस्थापकीय संचालक राधाकृष्णन बी., राज्यातील पीएम कुसुम-सी अर्थात मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना-२.० आणि पीएम कुसुम-बी अर्थात मागेल त्याला सौर कृषी पंप योजनेचे लाभार्थी शेतकरी उपस्थित होते. या कार्यक्रमात मा. प्रधानमंत्री श्री. नरेंद्र मोदी यांनी राज्यातील सौर ऊर्जा प्रकल्पातील विविध लाभार्थ्यांशी संवाद साधला.

मा. प्रधानमंत्री श्री. नरेंद्र मोदी म्हणाले की, सौर ऊर्जा प्रकल्पाचे खूप फायदे आहेत. शेतकऱ्यांना शेतीला दिवसा वीज उपलब्ध होते आहे त्याच बरोबर बारमाही पाण्याची व्यवस्था झाली आहे. यामुळे शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढले आहे. आता शेतकऱ्यांनी रसायनमुक्त शेती करण्यावर भर दिला पाहिजे. झिरो कॉस्ट फार्मिंगला देखील महत्त्व दिले पाहिजे. झिरो बजेट नैसर्गिक शेती ही अशी शेती पद्धत आहे, ज्यामध्ये रासायनिक खते, कीटकनाशके यांचा वापर कमी करून खर्च कमी केला जातो, ज्यामुळे शेतकऱ्यांची शेतीमध्ये आर्थिक गुंतवणूक वाचते आणि जमिनीचे आरोग्य सुधारते. त्याचबरोबर पारंपारिक शेतीऐवजी काळानुरूप बदलती शेती करणे गरजेचे आहे.

मा. प्रधानमंत्री श्री. नरेंद्र मोदी म्हणाले की, भारताला आज एक लाख करोड खाद्यतेलाची आयात करावी लागते. ही समस्या सोडवण्यासाठी शेतकऱ्यांनी खाद्यतेल बियांची लागवड करणे गरजेचे आहे. त्याचबरोबर मिलेटचीदेखील (भरडधान्य) सध्या खूप मागणी आहे, हे लक्षात घेता त्या प्रकारच्या पद्धतीची पिके घेतली तर शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढून शेतकऱ्यांची आर्थिक स्वावलंबनाकडे वाटचाल होईल. राज्याचे राज्यपाल आचार्य देवव्रत यांचे नैसर्गिक शेतीवरील व्याख्यान शेतकऱ्यांनी जरूर ऐकावे असे आवाहनही त्यांनी यावेळी केले.

#### मा. प्रधानमंत्री श्री. नरेंद्र मोदी यांनी लाभार्थ्यांशी संवाद साधत जाणून घेतल्या प्रकल्पाच्या यशोगाथा

मा. प्रधानमंत्री श्री. नरेंद्र मोदी यांनी शेतकऱ्यांना प्रकल्पाची यशोगाथा प्रत्यक्ष लाभार्थ्यांशी संवाद साधून जाणून घेतल्या. नाशिक जिल्ह्यातील सटाणा तालुक्यातील किकवारी येथील शेतकरी सुनील सिताराम काकुलते यांनी पीएम कुसुम-सी अर्थात मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना-२.० अंतर्गत ४० एकर जमीन सिंचनाखाली आणली. यामुळे दरवर्षी दोन लाख रुपये उत्पन्न वाढले आहे. ५० ते ६० लोकांना यामुळे रोजगार प्राप्त झाला असल्याचे त्यांनी सांगितले.

अकोला जिल्ह्यातील बार्शी टाकळी तालुक्यातील भेंडी महळ येथील शेतकरी तुषार वानखेडे यांनी १० मेगावॉट पीएम कुसुम-सी अर्थात मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजनेतून ६.५ एकरामध्ये सौर ऊर्जा प्रकल्प उभारला. यापूर्वी रात्री वीज नसल्यामुळे अडचणी निर्माण होत होत्या. शेतीला पाणी कमी पडत असल्यामुळे हरभऱ्यासारखे पीक घेतले जात होते. आता पपई आणि केळीचे पीक घेऊन ३५ हजार ऐवजी ८० हजार रुपयांचे उत्पन्न मिळत आहे, असे त्यांनी सांगितले.

जालना जिल्ह्यातील जाफराबाद तालुक्यातील सतेफाड येथील सुरत जटाळे यांनी मागेल त्याला सौर कृषी पंप योजनेतून पाच एचपीचा पंप बसवला. या योजनेमुळे त्यांच्या शेतीच्या उत्पन्नात भरघोस वाढ झाली. पंप बसवल्यापासून त्यांचे वार्षिक उत्पन्न साठ हजार रुपयांवरून दीड लाख रुपयांपर्यंत गेले, असे त्यांनी यावेळी सांगितले. शेतीमध्ये घरातीलच तीन व्यक्ती काम करत असून मुलाच्या शिक्षणासाठी आणि पुन्हा शेतीमध्ये उत्पन्न घेण्यासाठी आलेल्या नफ्याचा उपयोग करत असल्याचे त्यांनी सांगितले.

जालना जिल्ह्यातील बापकाळ येथील शेतकरी ताई किशोर सावंत म्हणाल्या की, पीएम कुसुम-बी अर्थात मागेल त्याला सौर कृषी पंप योजनेमध्ये दोन एकर क्षेत्रासाठी तीन एचपीचा सोलर पंप बसवला आहे. यामुळे सोयाबीन पिकाच्या उत्पादनात वाढ झाली. त्याचबरोबर उरलेल्या विजेचा इन्हवर्टरच्या माध्यमातून घरात वापर करण्यात येतो, असेही त्यांनी सांगितले.

(उर्वरित मजकुर पान क्र. १५ वर)



Printed & Published by Shri. Bharat Pawar of Maharashtra State Electricity Distribution Co. Ltd. Printed at Jyotirling Enterprises, 315 - B. Deen Bldg. Compound, Shop No. 32, N. M. Joshi Marg, Lower Parel (E), Mumbai - 400 011.
& Published at Hongkong Bank Bldg, M. G. Road, Fort, Mumbai - 400 001. Tel. : 2261 9100
The Company accepts no responsibility for the matter published in the journal.

संपादक : भारत पवार • उपसंपादक : विजयसिंह दुधभाते
पत्रव्यवहाराचा पत्ता : संपादक, महावितरण विद्युत वार्ता
प्रकाशगड, वांद्रे पूर्व, मुंबई - ४०० ०५१.
(खाजगी वितरणासाठी)